महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे - ४११००५
Email id :mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/७७८५
दिनांक : 09/02/2021

# आदेश

विषय:- कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे सुधारित आदेश-लॉकडाऊन टप्प्याटप्प्याने उठविणे आणि या कालावधीत प्रतिबंधने कमी करणेबाबत ( मिशन बिगिन अगेन ).

संदर्भ :- १) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२०/प्र क्र.५८/आरोग्य- ५, दिनांक १४ मार्च २०२०

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५

३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,१८९७

४) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DISM-1/दिनांक १७ एप्रिल २०२०, २१ एप्रिल २०२०,२९ जून २०२०,६ जुलै २०२०, ३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, ३० सप्टेंबर २०२०, , १४ ऑक्टोबर २०२०, २३ ऑक्टोबर २०२०,२९ ऑक्टोबर २०२०,३ नोव्हेंबर २०२०,१४ नोव्हेंबर २०२०, २३ नोव्हेंबर २०२०, २७ नोव्हेंबर २०२०,२१ डिसेंबर २०२०,२९ डिसेंबर २०२०, २९ जानेवारी २०२१

५) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९२३, दि.३१.०७.२०२०,२९३४,दि.०३.०८.२०२०, ३७९१,दि.०२.०९.२०२०, ४६१५,दि.०१.१०.२०२०, ४८२३,दि.०९.१०.२०२०, ४८७४,दि.१३.१०.२०२०, ५१३५,दि.२१.१०.२०२०, ५१९६,दि.२४.१०.२०२०, ५३४२,दि.२९.१०.२०२०, ५३४५,दि.३१.१०.२०२०, ५४६७,दि.०५.११.२०२०, ५६४३,दि.१९.११.२०२०, ५९४७,दि.०१.१२.२०२०, ६६०८,दि.२२.१२.२०२०, ६८३८,दि.३१.१२.२०२०, ७१३९,दि.११.०१.२०२१, ७३५५,दि.१६.०१.२०२१, ७४५८,दि.२०.०१.२०२१, ७५४७,दि.२२.०१.२०२१, ७५७४,दि.२२.०१.२०२१

ज्याअर्थी, कोविड-१९ या आजारास जागतिक आरोग्य संघटनेने जागतिक महामारी ( Pandemic ) घोषीत केले आहे. तसेच, उपरोक्त संदर्भाकित अधिसुचनेनूसार महाराष्ट्र राज्यामध्ये अधिसुचनेच्या दिनांकापासून साथरोग अधिनियम, १८९७ ची अंमलबजावणी सुरु झालेली आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्र. ४ अन्वये सदर लॉकडाऊनचा कालावधी (मिशन बिगिन अगेन) दिनांक २८/०२/२०२१ च्या मध्यरात्रीपर्यंत वाढविण्याबाबत आदेशीत केले आहे. तसेच, लॉकडाउन कालावधीत कोविड-१९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

ज्याअर्थी, सदर अधिनियमांतर्गत राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड -१९ उपाययोजना नियम -२०२० अंमलात आलेले आहेत. महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पुणे महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका,** पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड-१९ च्या प्रसारास प्रतिबंधित करण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

१) प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone)

- पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र (Micro Containment Zone) दिनांक ३१/१२/२०२० रोजी रात्री १२:०० पासून सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र निरंक म्हणून जाहीर करण्यात आले आहेत.
- पुणे महानगरपालिका क्षेत्रातील विशिष्ट क्षेत्र, विशिष्ट इमारत/ गृह निर्माण सोसायटी येथे पॉझीटीव्ह रुग्णांची संख्या आढळल्यास त्या कार्य क्षेत्राचे सहाय्यक आयुक्त, सनियंत्रण अधिकारी (Incident Commander ) म्हणून असे विशिष्ट क्षेत्र, विशिष्ट इमारत/ गृह निर्माण सोसायटी सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करू शकतील.
- त्यानुषंगाने कंटेनमेंट झोनबाबत मे.केंद्रशासन,मे.राज्यशासन व पुणे महानगरपालिकेने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश/निर्देश यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

२) सर्व आवश्यक वस्तू व सेवा यांची दुकाने या आदेशापुर्वी खुली ठेवण्यास परवानगी दिली आहे ते त्यानुसार सुरु राहतील.

३) यापूर्वी वेळोवेळी परवानगी देण्यात आलेले सर्व उपक्रम त्याकरिता निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना/अटीच्या आधारे पुढील आदेशापर्यंत सुरु राहतील.

४) संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

५) पुणे महानगरपालिकेने यापूर्वी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

सदर आदेश दि. ०१/०२/२०२१ पासून पुढील आदेशापर्यंत पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागूं राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी आज दिनांक ०१/०२/२०२१ रोजी दिलेला आहे.

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF POONA पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सन-१९५० EST.1950

( विक्रम कुमार )
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.

३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित